Estd: 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शिवाजी विद्यापीठाचा **57** वा वर्धापन दिन **दि.18 नोव्हेंबर 2019** रोजी संपन्न होत आहे. या अनुषंगाने विद्यापीठात विविध उपक्रम राबवून त्या अतंर्गत बक्षीस वितरणाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात येत आहे. सदरचे उपक्रम असे –

१. विद्यापीठातील पदव्युत्तर विभागातील व महाविद्यालयातील एका शिक्षकाचा **'गुणवंत शिक्षक'** म्हणून व विद्यापीठ संलंग्नीत महाविद्यालयातील एका प्राचार्यांचा **'गुणवंत प्राचार्य'** म्हणून सत्कार करणे.
२. विद्यापीठातील व महाविद्यालयातील प्रशासकीय सेवकांचा **'गुणवंत सेवक'**म्हणून सत्कार करणे.
३. विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या गुणवत्ता प्राप्त **पाल्यांचा** गौरव करणे.

तरी विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवक व संलंग्नीत महाविद्यालयातील ज्या प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवकांना गुणवंत पुरस्कारासाठी अर्ज करावयाचे आहेत त्यांनी आपली माहिती सोबतच्या विहित नमुन्यामध्ये पुराव्यादाखल योग्य त्या कागदपत्रासह व सुचीसह विभागप्रमुख/ प्राचार्य यांच्यामार्फत सादर करावी

तसेच विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांनी आपल्या पाल्यांची माहिती परस्पर आस्थापना विभागात सादर करावी.

तेव्हा उपरोक्त नुसार अर्ज तसेच माहिती **दि. 05/11/2019** पर्यत उपकुलसचिव, आस्थापना विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे सादर करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

विद्यापीठातील पदव्युत्तर विभागातील व महाविद्यालयातील शिक्षकांचा, प्राचार्य व प्रशासकीय सेवकांचा तसेच विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या पाल्यांचा गुणवत्ता गौरव याबाबतची नियमावली व निकष सोबत प्रमाणे जोडले आहेत.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**जा.क्र.आस्थापना/** 4178
**दिनांक** – 18 OCT 2019

**प्रति,**

१. विद्यापीठातील सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसपंर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी
४. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख.
५. मा.कुलगुरु, मा. प्र– कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
६. इंटरनेट विभाग– सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

Estd: 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विद्यापीठातील पदव्युत्तर विभागातील / महाविद्यालयातील शिक्षक, प्राचार्य व प्रशासकीय सेवकांचा तसेच विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांचा गुणवत्ता गौरव याबाबतची नियमावली व निकष.

**सर्वाच्यासाठी महत्वाच्या सुचना:–**

१. **अर्ज विहीत नमुन्यात, विहीत वेळेत संबधीत सक्षम अधिकाऱ्यांच्या मार्फत अग्रेषित करावा.**

२. **अर्जासोबत पुराव्यादाखल योग्य ती सर्व कागदपत्रे साक्षांकीत करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

३. **अर्जासोबतची कागदपत्रे योग्य त्या सुचीसह पृष्टांकीत करणे गरजेचे आहे.**

४. **उपक्रम / निकष / तपशीलवार संदर्भीय कागदपत्रांचे पृष्ट क्रमांक नमुद करावेत.**

## परिशिष्ट – अ

**अ –विद्यापीठ व महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य व शिक्षकांचा गौरव करताना विचारात घेतल्या जाणा–या बाबी :–**

| | |
|---|---|
| १. | दरवर्षी प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापक / सहा. प्राध्यापक यांच्या मधून एका शिक्षकाचा व संलग्नीत महाविद्यालयातील एका प्राचार्यांचा गुणगौरव केला जाईल. |
| २. | संपूर्ण सेवा कालावधीत एका शिक्षकाचा / प्राचार्याचा एकदाच गुणगौरव केला जाईल. |
| ३. | संबंधित शिक्षकांची सेवा किमान 15 वर्षे झालेली असावी. मागील **5** वर्षाचे गोपनीय अहवाल किमान चांगले असले पाहिजेत. |
| ४. | संबंधित शिक्षकाने केलेले संशोधन, विस्तार कार्य, संशोधन प्रकल्प हे सुद्धा विचारात घेतले जातील. |
| ५. | अभ्यासक्रमेतर (Extra-curriculam) व अभ्यासक्रमाशी तसेच प्रशासन यांचेशी निगडित कार्य (Co-curriculam) यांचाही विचार केला जाईल. |
| ६. | एखादया शिक्षकांनी गुणंवत पुरस्काराकरीता अर्ज केला नसेल परंतु समितीने त्यांची शिफारस केल्यास ती मान्य करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना राहतील. |
| ७. | गुणवंत शिक्षक व प्राचार्य पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी प्रामुख्याने सोबतच्या नमुन्याप्रमाणे गुणवत्तेचे निकष पडताळण्यात येतील. सोबतच्या नमुन्याप्रमाणे अर्ज करावेत. |
| ८. | संबंधित शिक्षकांवर यापूर्वी विभागीय चौकशी / परीक्षा प्रमादाबाबत कारवाई झाली आहे काय / सुरु आहे काय? व फौजदारी कारवाई झाली आहे काय? गुन्हा नोंद आहे काय? (महाविद्यालयीन स्तरावर कार्यवाही झाली नसल्याचे प्राचार्यांचे प्रमाणपत्र व फौजदारी कार्यवाही अथवा गुन्हा नोंद नसलेबददलचे प्रतिज्ञापत्र जोडण्यात यावे.) |

**ब –विद्यापीठ व महाविद्यालयातील गुणवंत शिक्षकेतर प्रशासकीय सेवकांचा गौरव करताना विचारात घेतल्या जाणा–या बाबी :**

| | |
|---|---|
| १. | **विद्यापीठ (प्रतिवर्षी)**<br>• वर्ग–1 मधून एक • वर्ग–2 मधून एक<br>• वर्ग–3 मधून एक • वर्ग–4 मधून एक<br>याप्रमाणे शिक्षकेतर कर्मचा–यांचा गुणगौरव केला जाईल.<br><br>**महाविद्यालय (प्रतिवर्षी)**<br>• वर्ग –3 मधून एक • वर्ग –4 मधून एक<br>याप्रमाणे शिक्षकेतर कर्मचा–यांचा गुणगौरव केला जाईल. |
| २. | संपूर्ण सेवा कालावधीत एका प्रशासकीय सेवकाचा एकदाच गुणगौरव केला जाईल. |

| | |
|---|---|
| ३. | संबंधित प्रशासकीय सेवकाची कार्यालयात कमीत कमी **15** वर्षे नियमित व किमान चांगली सेवा आवश्यक आहे. |
| ४. | प्रशासकीय सेवकाच्या एकूण सेवेतील अलिकडच्या सलग **पाच** वर्षाच्या काळातील गोपनीय अहवाल समाधानकारक असणे आवश्यक. |
| ५. | प्रशासकीय सेवकानी विद्यापीठाच्या/ महाविद्यालयाच्या उन्नतीसाठी व लौकिक वृध्दीगंत करण्यासाठी केलेले प्रयत्न व त्याचा तपशील विचारात घेतला जाईल. |
| ६. | प्रशासकीय सेवकाने विद्यापीठ/महाविद्यालय कामकाजात सुचविलेल्या तसेच केलेल्या सुधारणांचा तपशील. |
| ७. | प्रशासकीय सेवकाने कार्यालयातील निरनिराळया विभागात केलेल्या कामाचा तपशील. |
| ८ | प्रशासकीय सेवकाचे सामाजिक कार्य, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य, साहित्य, क्रीडा व कला क्षेत्रातील कार्याचा तपशील. |
| ९ | प्रशासकीय सेवकाने सेवेत असताना विद्यापीठ/ महाविद्यालय कामकाजासंबधी निरनिराळया प्रशिक्षण वर्गात घेतलेल्या सहभागाचा तपशील व त्या प्रशिक्षणाच्या अनुषंगाने केलेल्या सुधारणांचा तपशील. |
| १० | प्रशासकीय सेवकाने विद्यापीठ व महाविद्यालय सेवेत प्रवेश केल्यानंतर सुधारलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील. |
| ११ | एकुण व्यक्तिमत्व, कार्यालयातील वर्तणुक, सौजन्यशीलता, नेतृत्वगुण, सहकार्याची भावना इत्यादीचा विचार करण्यात येईल |
| १२ | एखादया प्रशासकीय सेवकाने गुणंवत पुरस्काराकरीता अर्ज केला नसेल परंतु समीतीने त्यांची शिफारस केल्यास ती मान्य करण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना राहतील. |
| १३ | गुणवंत सेवक पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी प्रामुख्याने सोबतच्या नमुन्याप्रमाणे गुणवत्तेचे निकष पडताळण्यात येतील. सोबतच्या नमुन्याप्रमाणे अर्ज करावेत. |
| १४ | संबंधित प्रशासकीय सेवकावर यापूर्वी विभागीय चौकशी/परीक्षा प्रमादाबाबत कारवाई झाली आहे काय/सुरु आहे काय? व फौजदारी कारवाई झाली आहे काय? गुन्हा नोंद आहे काय? (महाविद्यालयीन स्तरावर कार्यवाही झाली नसल्याचे प्राचार्यांचे प्रमाणपत्र व फौजदारी कार्यवाही अथवा गुन्हा नोंद नसलेबददलचे प्रतिज्ञापत्र जोडण्यात यावे.) |

**क – विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांचा गुणवत्ता गौरव करताना विचारात घेतल्या जाणा–या बाबी :**

| | |
|---|---|
| १. | दरवर्षी विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांपैकी स्वतंत्रपणे दहावी गुणानुक्रमे पहिले तीन, बारावी विद्याशाखानिहाय तीन (प्रत्येक शाखेतून एक फक्त), पदवी व पदव्युत्तर परीक्षेत विद्याशाखानिहाय तीन (प्रत्येक शाखेतून एक फक्त). |
| २. | याबाबतीत कमीत कमी 60 टक्के गुण प्रत्येक परीक्षेत मिळविणे अनिवार्य राहील. |
| ३. | संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर स्तरावर मिळविलेल्या गुणांचा/यशाचा तपशील |
| ४. | संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी खेळामध्ये, सांस्कृतिक कार्यामध्ये व विविध स्पर्धामध्ये मिळविलेले विशेष प्राविण्य. |
| ५. | संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी कोणत्या आर्थिक परिस्थितीतून शिक्षण पूर्ण केले आहे त्याचा तपशील |
| ६. | संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्पर्धात्मक परीक्षेत सहभाग घेतला असल्यास त्यात मिळविलेल्या यशाचा तपशील . |
| ७. | संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर करीत असलेले कामकाज/कार्य याचा तपशील. |
| ८. | संबंधित शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी केलेल्या विशेष उल्लेखनीय कामगिरीचा तपशील. |

विद्यापीठातील पदव्युत्तर विभाग/ महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक व गुणवंत प्रशासकीय सेवक तसेच विद्यापीठातील शिक्षकांच्या व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी शैक्षणिक बाबतीत मिळविलेली गुणवत्ता विचारात घेऊन त्यांचा सत्कार करताना विद्यापीठातर्फे प्रदान करावयाच्या पारितोषिकांचा तपशील.

## परिशिष्ट – ब

**अ – विद्यापीठ पदव्युत्तर विभागातील व महाविद्यालयातील गुणवंत शिक्षक व गुणवंत प्रशासकीय सेवकाचा गौरव.**

१. गौरवास पात्र ठरणा–या शिक्षक, प्राचार्य व प्रशासकीय सेवकास 10 " बाय 6 " या आकाराची अंडाकृती 400 ग्रॅम वजनाची एक चांदीची थाळी विद्यापीठातर्फे प्रदान केली जाईल.

२. गौरवास पात्र ठरणा--या शिक्षकास, प्राचार्य व प्रशासकीय सेवकास रोख रु. 5000/– चे पारितोषिक व शाल व श्रीफळ दिले जाईल आणि सन्मानार्थ प्रमाणपत्र देण्यात येईल.

३. संबंधित शिक्षकाचा, प्राचार्य व प्रशासकीय सेवकाचा फोटो वार्षिक अहवालामध्ये छापण्यात येईल.

४. प्राप्त अर्जात कोणीही सुयोग्य नाही असे वाटल्यास, समिती कोणाचीही शिफारस करणार नाही.

**ब – विद्यापीठ शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांचा शैक्षणिक गुणवत्तेबाबत गौरव.**

विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांच्या मुलांनी शैक्षणिक बाबतीत मिळविलेली गुणवत्ता विचारात घेऊन त्यांचा सत्कार करताना प्रदान केल्या जाणा–या पारितोषिकाचा शिक्षकांच्या पाल्यांसाठी व प्रशासकीय सेवकांच्या पाल्यांसाठी स्वतंत्रपणे तपशील :

- इयत्ता दहावीमध्ये (S.S.C.) सर्वप्रथम 3 –
  अनुक्रमे रोख रु. 2000/–,रु. 1500/–,रु. 1000/–

- इयत्ता बारावीमध्ये (H.S.C.) विद्याशाखानिहाय
  सर्वप्रथम प्रत्येकी एक – रोख रुपये 2000/– प्रत्येकी.

- **पदवी परीक्षांमध्ये खालीलप्रमाणे सर्वप्रथम येणा–यास प्रत्येकी रोख रुपये 2000/–**
  - बी.ए.
  - बी.कॉम.
  - बी.एस्सी.
  - अन्य पदवी परीक्षेतील दोन परीक्षा

- **पदव्युत्तर पदवी परीक्षांमध्ये खालीलप्रमाणे सर्वप्रथम येणा–यास प्रत्येकी रोख रुपये 2000/–**
  - एम .ए.
  - एम .कॉम.
  - एम .एस्सी.
  - अन्य पदव्युत्तर परीक्षेतील दोन परीक्षा

संबंधित शिक्षक/ प्रशासकीय सेवकांच्या मुलास विद्यापीठातर्फे प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच विद्यापीठाच्या वार्षिक अहवालामध्ये सत्कार समारंभाचा योग्य त्या मथळयाखाली उल्लेख केला जाईल.

Estd: 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पासपोर्ट साईजचा फोटो लावणे

## विद्यापीठातील पदव्युत्तर विभागातील/संलग्न महाविद्यालयातील शिक्षका, प्राचार्य यांनी गुणवंत पुरस्कारासाठी करावयाचा अर्जाचा नमुना

शिक्षकाचे नांव : पदनाम :

शैक्षणीक अर्हता : अनुभवः

अधिविभागाचे/महाविद्यालयाचे नाव :

संपर्क पत्ता :

| अ. क्र. | गुणवत्ता निकष | संबंधितांची माहिती (आवश्यकता असल्यास जोडपत्र जोडणे) | पुरावा दाखल जोडलेल्या कागदपत्राचा पृष्ट क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | **अध्ययन, अध्यापन, मुल्यमापन :– (कमाल 90 गुण)** | | |
| | **अ) शैक्षणिक अर्हता – ( 10 गुण )**<br>(मेरीट होल्डर–2 गुण, B+ - 2 गुण, नेट/सेट/जेआरएफ–2 गुण, एम.फिल–2 गुण, पीएच डी–2 गुण ) | | |
| | **ब) अध्यापन – (10 गुण)**<br>अध्यापन अनुभव 20 ते 25 वर्ष – 5 गुण, 25 वर्षापेक्षा जास्त – 10 गुण<br>**(अनुभव प्रमाणपत्र/ सेवेचा दाखला जोडावा)** | | |
| | **क) अध्यापन व अध्यापनाशी निगडीत बाबी – (40 गुण)**<br>(i) मागील पाच वर्षातील SA/API मधील मानांकन अतिउत्कृष्ट – 8 गुण व उत्कृष्ट – 5 गुण, समा /चांगला – 3 गुण,<br>(ii) Above 80 – 8 marks, (70 – 80) – 5 marks, below 70 – 3 marks<br>**( नमुना 'क' प्रमाणे प्रमाणपत्र आवश्यक)** | | |
| | **ड) शिष्यवृत्ती/पुरस्कार ( 15 गुण )**(संबधित शिक्षकाने प्राप्त केलेली शिष्यवृत्ती)<br>( शासकिय, निमशासकिय, मान्यताप्राप्त संस्था यांनी दिलेले पुरस्कार/शिष्यवृत्ती)<br>विद्यापीठीय – 3 गुण, राज्यस्तरीय –5 गुण, राष्ट्रीय –7 गुण, आंतरराष्ट्रीय – 10) | | |
| | **इ) सहभाग व आयोजन (15 गुण)**<br>सहभाग व सादरीकरण – 3 गुण, निमंत्रित व्याख्याता – 4 गुण, सभाध्यक्ष<br>(UGC/Session Chairman/ Refresher) – 2 गुण, समन्वयक – 2 गुण | | |
| २. | **संशोधन (जास्तीत जास्त 60 गुण)**<br>**अ) प्रकाशन गुण (20)** (विद्यापीठ –2 गुण, राज्यस्तरीय–3 गुण, राष्ट्रीय–4 गुण, आंतरराष्ट्रीय–5 गुण) | | |
| | **ब) संशोधन प्रकल्प गुण (10)**<br>(मायनर 1 गुण, मेजर 2 गुण, ) माहिती पाठवितांना मंजुरी पत्र जोडावे.) | | |
| | **क) संशोधन– मार्गदर्शन – ( 20 गुण )**<br>( पी.एचडी – 2 गुण, एम. फिल –01 पदवी प्राप्त विद्यार्थी संख्या ) | | |
| | **ड) कमिक पुस्तके – (10 गुण)**<br>(क्रमिक –4 गुण, सहलेखकांच्या संख्येने भागून गुणांकन ठरवावे), संदर्भ ग्रंथ – 2 गुण | | |
| ३. | **मुल्यमापन ( 20 गुण )**<br>( महाराष्ट्र लोकसेवा आयोग/युपीएससी 2 गुण, एम.फिल –2 गुण, पीएच डी, 4 गुण, प्रकल्प मुल्यामापन–2, संशोधनपर लेखांचे परिक्षण – 2, नॅक मुल्यांनकन सदस्य – 4, विद्यापीठ अनुदान आयोग/ नॅक प्रस्ताव समिती सदस्य – 4) | | |
| ४. | **अ) विस्तार कार्य – ( 10 गुण ) –** ( सामाजिक संस्थांचे पदाधिकारी – 2 गुण, राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी –3 गुण, राष्ट्रीय सेवायोजन प्रकल्प अधिकारी –3 गुण,) | | |
| | **ब) विविध अधिकार मंडळाचे काम ( 10 गुण )**<br>(अभ्यास मंडळ –2 गुण, सिनेट –2 गुण, विद्यापरिषद– 3 गुण, फॅकल्टी – 3 गुण, अधिष्ठाता – 3 गुण, व्यवस्थापन परिषद –2 गुण) | | |
| | **क) कार्यकारणी (10 गुण) (विषयाशी संबधित संघटना/कार्यकारणी)** आंतरराष्ट्रीय सदस्य–4 गुण, राष्ट्रीय सदस्य–2 गुण, राज्यस्तरीय सदस्य–2 गुण, विद्यापीठ स्तरीय–2 गुण | | |

संबंधीत प्राचार्य शिक्षक यांची सही

अधिविभागप्रमुख /प्राचार्यांची सही

Estd: 1962
NAAC 'A' Grade

पासपोर्ट साईजचा फोटो लावणे

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठ वर्ग 1, 2 व 3 व संलग्न महाविद्यालयातील वर्ग –3 मधील प्रशासकीय सेवकांनी गुणवंत पुरस्कारासाठी करावयाचा अर्जाचा नमुना

नांव : पदनाम :

शैक्षणीक अर्हता : अनुभव :

विद्यापीठातील विभाग / महाविद्यालयाचे नाव :

| अ.क्र. | गुणवत्ता निकष | संबंधितांची माहिती |
|---|---|---|
| १. | **शैक्षणिक अर्हता ( 10 गुण)**<br>अ) नियुक्तीच्या वेळी शैक्षणिक अर्हताः<br>ब) सेवेत असतांना शैक्षणिक अर्हतेत केलेली वाढ<br>(पदवी–3 गुण, पदव्युत्तर –5 गुण, इतर सर्टी. कोर्सेस–2 गुण, एम.फिल– 6 गुण, पीएच डी–7 गुण) | |
| २. | **विद्यापीठ / महाविद्यालयातील निरनिराळया विभागात केलेल्या कामाचा तपशील ( 10 गुण)**<br>( पाच वर्षासाठी प्रत्येक वर्षी )<br>(अत्युत्कृष्ट 5 गुण, उत्कृष्ट 4 गुण, निश्चित चांगली 3 गुण, चांगला 2 गुण,)<br>**( नमुना 'क' प्रमाणे प्रमाणपत्र आवश्यक)** | |
| ३ | **विद्यापीठ / महाविद्यालयातील नॅक मुल्याकंनाच्या वेळी केलेल्या कामाचा तपशील ( 10 गुण)** (तपशील जोडावा) | |
| ४. | **विद्यापीठ / महाविद्यालयाच्या विविध समित्यावर केलेल्या कामाचा तपशील( 10 गुण)**<br>(विद्यापीठस्तरीय –4 गुण, एलएमसी–3 गुण, इतर समिती –1 गुण ) | |
| ५. | **विद्यापीठ / महाविद्यालयाच्या कामकाजासंबंधी प्रशिक्षण / कार्यशाळा यामध्ये सहभाग घेतल्याचा व त्या अनुषंगाने केलेल्या सुधारणांचा तपशील( 10 गुण)**<br>(विद्यापीठस्तरीय कार्यशाळा –2 गुण, महाविद्यालयस्तरीय –1 गुण ) | |
| ६. | **कार्यालयीन कामात संगणक / आयटी चा वापर ( 10 गुण)**<br>i) संगणक वापर (MS Office), 3 गुण ii) Intenet वापर, 3 गुण<br>iii) E-mail द्वारा पत्रा व्यवहार, 3 गुण iv) इतर माहिती नुमद करणे, 1 गुण | |
| ७ | **विद्यापीठ / महाविद्यालय कामकाजासंबंधी वेगवेगळया ठिकाणी तज्ञ व्यक्ती म्हणून दिलेल्या व्याख्यानाचा तपशील ( 10 गुण)**<br>(प्रती व्याख्यान –विद्यापीठस्तरीय–2 गुण, इतर–1 गुण, राष्ट्रीय / राज्य स्तरीय– 3 गुण) | |
| ८ | **शैक्षणिक / सामाजिक / साहित्य, कला व क्रीडा क्षेत्रातील कामाचा तपशील ( 10 गुण)**<br>(जिल्हा स्तरीय–4 गुण,तालुका स्तरीय–3 गुण, भाहर / ग्रामीण–2 गुण, महाविद्यालयीन–2 गुण ) | |
| ९ | **आतापर्यत मिळालेल्या पुरस्कारांचा / पारितोषिकांचा तपशील (10 गुण)**<br>(आंतरराष्ट्रीय – 5 गुण, राष्ट्रीय –4 गुण, राज्यस्तरीय– 3 गुण, विद्यापीठस्तरीय–2 गुण, महाविद्यालय स्तरीय–1 गुण ) | |
| 10 | **विशेष कामगिरी / इतर कला कौशल्य ( 10 गुण)**<br>(किरकोळ / हक्काची रजा 75% पेक्षा कमी घेतलेले असल्यास – 8 गुण, एकही रजा न घेतलेस –10 गुण ) | |

संबंधीत सेवकाची सही विभाप्रमुख / प्राचार्यांची सही

Estd 1962
NAAC 'A' Grade

पासपोर्ट साईजचा फोटो लावणे

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## विद्यापीठ व महाविद्यालयातील वर्ग-४ मधील प्रशासकीय सेवकांनी गुणवंत पुरस्कारासाठी करावयाचा अर्जाचा नमुना

| | |
|---|---|
| प्रशासकीय सेवकाचे नाव | |
| विभाग | |
| शैक्षणिक अर्हता – गुण / टक्केवारी | |
| हुद्दा | |
| एकूण सेवा | |
| निरनिराळ्या विभागात केलेल्या कामाचा तपशिल | |
| विद्यापीठाच्या उन्नतीसाठी व लौकिक वृध्दिंगत करण्यासाठी केलेल्या कामाचा तपशिल | |
| विद्यापीठ कामकाजात सुचविलेल्या व केलेल्या सुधारणांचा तपशिल | |
| सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, क्रिडा व कला क्षेत्रातील कामाचा तपशिल | |
| विद्यापीठाच्या कामकाजासंबंधी निरनिराळ्या प्रशिक्षण वर्गात सहभाग घेतल्याचा व त्या अनुषंगाने केलेल्या सुधारणांचा तपशिल | |

संबंधीत सेवकाची सही

विभागप्रमुख / प्राचार्यांची सही

## नमुना – अ

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,.......................................................................................................(आडनाव प्रारंभ करुन संपुर्ण नांव) यांचेवर यापुर्वी कोणतीही विभागीय चौकशी समिती नेमलेली नसून त्यांची कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नाही. तसेच कोणत्याही परिक्षेतील गैरव्यवहाराबाबत शिक्षा/समज/ठपका ठेवण्यात आलेला नाही.

ठिकाण :–

दिनांकः–

**प्राचार्य/ विभागप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का**

---

## नमुना –ब

# प्रतिज्ञापत्र

मी,..............................................................................( आडनाव प्रारंभ करुन संपूर्ण नांव) प्रतिज्ञापुर्वक लिहून देतो की, गुणवंत शिक्षक/ गुणवंत सेवक पुरस्कारासाठी अर्ज करत असून माझ्याविरुध्द कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये कोणताही गुन्हा दाखल नसून मला कोणत्याही फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली नाही

ठिकाण :–

दिनांकः–

प्राचार्य/शिक्षक/ प्रशासकीय सेवकांची सही.........................................

प्राचार्य/शिक्षक/ प्रशासकीय सेवकांचे नाव.........................................

प्राचार्य/ विभागप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का

---

## नमुना –क

# प्रमाणपत्र

प्रमाणीत करणेत येते की,–––––––––––––––––––––––––––––––– यांचा मागील ५ वर्षातील गोपनीय अहवालाची प्रतवारी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | सन | प्रतवारी |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |

**प्राचार्य/ सेक्रेटरी/ रजिस्ट्रार-**